# डिजिटल मतदार यादी (DVL)

## सहकारी संस्था वापरकर्ता नोंदणी मार्गदर्शक

*व्यवस्थापन समिती पदाधिकारी / व्यवस्थापक यांच्यासाठी नोंदणी प्रक्रिया*

iits

INFINITE IT SOLUTIONS PVT. LTD.

# DVL बद्दल पूर्व माहिती आवश्यक

ही नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी पुढील बाबींची माहिती असणे उपयुक्त ठरेल:

- ❖ DVL म्हणजे काय? (Digital Voters List प्रणालीची ओळख)
- ❖ सहकारी संस्थांसाठी Quick Operational Guide (QOG)
- ❖ वापरकर्ता जीवनचक्र (User Lifecycle) — संदर्भासाठी
- ❖ DVL प्रणालीतील संक्षिप्त शब्द (Abbreviations)

नोंद: संबंधित मार्गदर्शक व दस्तऐवज DVL संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

# उद्देश

ही मार्गदर्शिका सहकारी संस्थांच्या व्यवस्थापन समिती पदाधिकारी / व्यवस्थापक यांना DVL प्रणालीमध्ये वापरकर्ता नोंदणी प्रक्रिया समजण्यासाठी तयार करण्यात आली आहे.

यामध्ये पुढील बाबींचा समावेश आहे:

- ❖ नवीन वापरकर्ता नोंदणी प्रक्रिया
- ❖ आवश्यक माहिती
- ❖ ई-मेल सत्यापन प्रक्रिया
- ❖ लॉगिन व वापरकर्ता माहिती पडताळणी

# कोणाला नोंदणी करावी लागेल? (Who Needs to Register)

सहकारी संस्थेच्या वतीने, खालीलपैकी कोणीही व्यक्ती DVL प्रणालीमध्ये नवीन वापरकर्ता म्हणून नोंदणी करू शकते:

- ❖ सहकारी संस्थेच्या व्यवस्थापन समिती पैकी कोणताही एक पदाधिकारी
- ❖ संस्थेचे व्यवस्थापक
- ❖ मतदार यादी तयार करण्यासाठी अधिकृत प्रतिनिधी

***नोंद :*** *Registrar Offices/Officers यांनी स्वतंत्र नोंदणी करू नये. त्यांना लॉगिन तपशील स्वतंत्रपणे प्रदान केले जातात. ही सूचना केवळ Registrar Offices साठी आहे; सहकारी संस्थांनी या सूचनेकडे दुर्लक्ष करावे*

# वापरकर्ता भूमिका - CS Admin, व प्रमुख जबाबदाऱ्या

या नोंदणी प्रक्रियेद्वारे तयार होणाऱ्या वापरकर्त्यास **CS Admin** (Cooperative Society Admin) असे संबोधले जाते. CS Admin च्या प्रमुख जबाबदाऱ्या:

- ई-मेल नोंदणी व सत्यापन करणे (ही प्रक्रिया)
- फॉर्म ई-२ भरणे, सादर करणे व PVL तयार करण्यासाठी मान्यता मिळवणे
- PVL साठी मूलभूत माहिती प्रविष्ट करणे
- SaaS शुल्क भरणे
- प्रारूप मतदार यादी (PVL) तयार करणे
- PVL पडताळणे व लॉक करणे
- PVL ची छापील प्रत तपासणीसाठी Registrar कडे सुपूर्द करणे, जेणेकरून ती SCEA च्या अधिकृत संकेतस्थळावर Registrar द्वारे प्रकाशित केली जाईल.

# माहितीसाठी: पुढे काय होते? *Registrar Office* काय करते?

- *फॉर्म ई-२ ला मान्यता देते*
- *Registrar PVL तपासून प्रकाशित करतात*
- *प्रकाशित PVL सार्वजनिकरीत्या उपलब्ध होते (Watermark शिवाय)*
- *सदस्य / नागरिक:*
  - *SCEA अधिकृत संकेतस्थळावरून PVL डाउनलोड करू शकतात https://scea.maharashtra.gov.in/*
  - *PVL वरील QR कोड द्वारे किंवा DVL च्या https://dvl.scea.in संकेतस्थळावरून मतदार शोध वेबलिंकद्वारे मतदार शोधू शकतात*
- *हरकती व आक्षेप Registrar द्वारे स्वीकारून निकाली काढले जातात*
- *Registrar PVL अद्ययावत करून अंतिम मतदार यादी (FVL) म्हणून प्रकाशित करतात*

# नोंदणीपूर्वी आवश्यक माहिती

नोंदणी सुरू करण्यापूर्वी, प्रस्तावित वापरकर्त्याने त्याची खालील माहिती तयार ठेवावी:

- ❖ वैध ई-मेल आयडी
- ❖ सक्रिय भ्रमणध्वनी क्रमांक
- ❖ पहिले नाव व आडनाव (इंग्रजीत)
- ❖ स्क्रीनवर दर्शवायचे नाव (मराठी किंवा इंग्रजीमध्ये)

***नोंद:*** *स्क्रीनवर दाखवायचे नाव* ***शक्य तितके लहान*** *असले पाहिजे, ते फक्त स्क्रीनच्या वरच्या उजव्या बाजूला दाखवले जाते.*

# वापरकर्ता नोंदणी कार्यप्रवाह

1. DVL वेबसाइटला भेट द्या
2. नवीन वापरकर्ता नोंदणी सुरू करा
3. संपर्क तपशील भरा
4. वैयक्तिक माहिती भरा
5. तपशील पडताळा व नोंदणी करा
6. ई-मेल सत्यापन
7. लॉगिन करा

# STEP 1-अ: DVL वेबसाइटला भेट द्या


तुमच्या डेस्कटॉप / लॅपटॉप / मॅकबुक संगणकावर:

1. ब्राउझर उघडा (Google Chrome वापरणे शिफारसीय आहे)
2. ॲड्रेस बारमध्ये खालील संकेतस्थळ लिहा:
   https://dvl.scea.in
3. एंटर दाबा.

यानंतर DVL प्रणालीचे मुख्य पृष्ठ (Home Page) दिसेल.

*(पुढील स्लाईडमध्ये प्रदर्शित होणारे पृष्ठ दाखवले आहे.)*

# STEP 1-ब: DVL प्रणालीचे मुख्य पृष्ठ (Welcome Screen)




DVL प्रणालीचे मुख्य पृष्ठ येथे दर्शविले आहे.

# STEP 2-अ: नवीन वापरकर्ता नोंदणी सुरू करा

तुमच्या संगणकावर / लॅपटॉपवर / मॅकबुकवर:

1. मुख्य पृष्ठावर “आजच नोंदणी करा!” या लिंकवर क्लिक करा.
2. यानंतर पृष्ठावर नवीन वापरकर्ता नोंदणी विभाग दिसेल.
3. तेथे पुढील टप्प्यांनुसार नोंदणी प्रक्रिया पूर्ण करा.

# STEP 2-ब: नवीन वापरकर्ता नोंदणी सुरू करा



# STEP 3: 🔐 पासवर्ड तयार करताना नियम (Tab 1)

सुरक्षित पासवर्ड तयार करण्यासाठी खालील नियम पाळा:

- ✓ किमान 8 अक्षरे असावीत
- ✓ किमान एक मोठे अक्षर (A–Z) असावे
- ✓ किमान एक छोटे अक्षर (a–z) असावे
- ✓ किमान एक अंक (0–9) असावा
- ✓ किमान एक विशेष चिन्ह असावे (उदा. @, #, $, %)

टाळावे:

- ➢ नाव किंवा मोबाईल क्रमांक वापरणे
- ➢ सोपे पासवर्ड (उदा. 123456, password)
- ➢ इतरांसोबत पासवर्ड शेअर करणे

⭐ *नोंद: पासवर्ड सुरक्षित ठेवा.*
*तो विसरल्यास "पासवर्ड विसरलात?" पर्याय वापरावा.*

सर्व तपशील अचूक भरल्यानंतर "पुढे" या बटणावर क्लिक करा.


# STEP 3-अ: संपर्क तपशील व पासवर्ड प्रविष्ट करा (Tab 1)

या टप्प्यात खालील संपर्क तपशील प्रविष्ट करा:

1. **वैध ई-मेल आयडी** [ई-मेल आयडी भविष्यात लॉगिनसाठी वापरला जाईल]
2. **सक्रिय भ्रमणध्वनी क्रमांक** [भ्रमणध्वनी क्रमांक सक्रिय असावा]
3. **पासवर्ड** [पासवर्ड सुरक्षित व लक्षात ठेवण्यास सोपा असावा]
4. **पासवर्डची पुष्टी** (Confirm Password)

सर्व तपशील अचूक भरल्यानंतर “पुढे” या बटणावर क्लिक करा.

# STEP 3-ब: संपर्क तपशील व पासवर्ड प्रविष्ट करा (Tab 1)




१. येथे वैध ई-मेल आयडी प्रविष्ट करा

२. येथे सक्रिय भ्रमणध्वनी क्रमांक प्रविष्ट करा

३. येथे पासवर्ड प्रविष्ट करा

४. येथे कन्फर्म पासवर्ड प्रविष्ट करा

**नोंद:** ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक बरोबर असल्याची खात्री करा. चुकीची माहिती दिल्यास पुढील प्रक्रिया अडथळित होऊ शकते.

५. संपर्क तपशील प्रविष्ट करून “पुढे” बटणावर क्लिक करा.


# STEP 4-अ: वैयक्तिक माहिती प्रविष्ट करा (Tab 2)

या टप्प्यात खालील वैयक्तिक माहिती प्रविष्ट करा:

1. पहिले नाव (इंग्रजीमध्ये)
2. आडनाव (इंग्रजीमध्ये)
3. स्क्रीनवर दर्शवायचे नाव (इंग्रजी किंवा मराठीमध्ये)
4. लिंग निवडा
5. जन्मतारीख प्रविष्ट करा
    - कॅलेंडर वापरू शकता
    - माहिती उपलब्ध नसल्यास “माहित नाही” निवडा

सर्व तपशील भरल्यानंतर “पुढे” या बटणावर क्लिक करा.

# STEP 4-ब: वैयक्तिक माहिती प्रविष्ट करा (Tab 2)




१. येथे पहिले नाव प्रविष्ट करा

२. येथे आडनाव प्रविष्ट करा

३. येथे स्क्रीनवर दाखवायचे प्रविष्ट करा

४. येथे लिंग निवडा

५. येथे जन्मतारीख प्रविष्ट करा

अचूक माहिती दिल्यास नोंदणी प्रक्रिया सुरळीत पूर्ण होते.

६. वैयक्तिक माहिती भरून "पुढे" बटणावर क्लिक करा.


# STEP 5-अ: तपशील तपासा व नोंदणी करा (Tab 3)

या टप्प्यात स्क्रीनवर दर्शविलेले सर्व तपशील काळजीपूर्वक तपासा:


1. ई-मेल आयडी
2. भ्रमणध्वनी क्रमांक
3. पहिले नाव व आडनाव
4. स्क्रीनवर दर्शवायचे नाव
5. लिंग
6. जन्मतारीख

सर्व माहिती अचूक असल्याची खात्री करून “नोंदणी करा” या बटणावर क्लिक करा.

# STEP 5-ब: तपशील तपासा व नोंदणी करा (Tab 3)




माहितीमध्ये बदल करायचा असल्यास “मागे” बटणाचा वापर करू शकता.




१. सर्व तपशील पडताळून “नोंदणी करा” बटणावर क्लिक करा.

# STEP 6-अ: नोंदणी यशस्वी संदेश


नोंदणी पूर्ण झाल्यानंतर पुढील संदेश दिसेल:

- **“नवीन वापरकर्ता नोंदणी यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहे.”**

तसेच:

- ई-मेल सत्यापनासाठी लिंक पाठवण्यात आली आहे
- लॉगिन करण्यापूर्वी ई-मेल सत्यापन आवश्यक आहे

# STEP 6-ब: नोंदणी यशस्वी संदेश




नोंदणी यशस्वी झाल्याचा संदेश.

# STEP 7-अ: ई-मेल सत्यापन

आपल्या ई-मेल आयडीवर सत्यापनासाठी संदेश प्राप्त होईल.

**सत्यापन प्रक्रिया:**

- ई-मेलमधील सत्यापन लिंक वर क्लिक करा

किंवा

- लिंक कॉपी करून ब्राउझरमध्ये उघडा

सत्यापन पूर्ण झाल्यानंतर संदेश दिसेल:

**“ई-मेल आयडी यशस्वीरीत्या सत्यापित केला आहे.”**

# STEP 7-ब: ई-मेल सत्यापन

**डिजिटल मतदार यादी - नोंदणी प्रक्रिया, ई-मेल आयडी खात्री करण्याबाबत ([redacted]** Inbox ×

**e-elect.in Administrator** donotreply@e-elect.in via mailgun.org
to me, IITS.Election

१. कृपया तुमचा ईमेल तपासा.

नमस्कार,

आम्हाला अलीकडेच डिजिटल मतदार यादी - वापरकर्ता नोंदणी (User Registration) करण्यासाठी खालील माहिती प्रा

२. आपल्या ई-मेल आयडीवर सत्यापनासाठी संदेश प्राप्त होईल.

- भ्रमणध्वनी: [redacted]
- ई-मेल आयडी: [redacted]
- पहिले नाव: [redacted]
- आडनाव: [redacted]
- स्क्रीनवर दाखवायचे नाव: [redacted]
- लिंग: [redacted]
- जन्म तारीख: माहित नाही [redacted]

जर वरील माहिती वैध आणि अचूक असेल तर वापरकर्ता नोंदणी (User Registration) प्रक्रियेचा पहिला टप्पा पूर्ण करण्यासाठी (ई-मेल आयडी ची खात्री करण्यासाठी) खालील लिंकवर क्लिक करा किंवा लिंक कॉपी करा आणि आपल्या ब्राउझरमध्ये पेस्ट करा.

**ई-मेल आयडी सत्यापन लिंक (verification link):** ई-मेल आयडी बरोबर असल्याची खात्री करण्यासाठी इथे क्लिक करा


जर आपण आपला ईमेल आयडी नोंदविण्यासाठी विनंती केली नसेल तर आपला ईमेल आयडी नोंदणी प्रक्रिये मधून हटवण्यासाठी ... लिंकवर क्लिक करा किंवा कॉपी करा आणि आपल्या ब्राउझरमध्ये पेस्ट करा.

ई-मेल आयडी काढून टाकण्यासाठी आणि नोंदणी प्रक्रिया रद्द करण्यासाठी इथे क्लिक करा

*माहिती प्राप्त झाल्याचा दिनांक व वेळ: 13-12-2025 12:49:17 PM*
*नोंदणी क्रमांक (प्रणाली द्वारे निर्मित): 7090*
*आयपी अॅड्रेस (IP Address): --*
*ई-मेल सत्यापन कोड (OTP): 913222*

३. ई-मेलमधील सत्यापन लिंकवर क्लिक करा.

# STEP 7-क: ई-मेल सत्यापन




# STEP 8-अ: DVL प्रणालीमध्ये लॉगिन करा

ई-मेल सत्यापन पूर्ण झाल्यानंतर:

1. https://dvl.scea.in येथे भेट द्या
2. वापरकर्ता आयडी म्हणून ई-मेल आयडी प्रविष्ट करा
3. पासवर्ड प्रविष्ट करा
4. “लॉग-इन” बटणावर क्लिक करा



# STEP 8-अ: DVL प्रणालीमध्ये लॉगिन करा



# STEP 9-अ: वापरकर्ता मुख्य पृष्ठ

लॉगिन केल्यानंतर आपण **वापरकर्ता मुख्य पृष्ठावर** पोहोचाल.

येथे पुढील माहिती दिसेल:

- नाव
- स्क्रीनवर दर्शवायचे नाव
- ई-मेल व सत्यापन स्थिती
- भ्रमणध्वनी क्रमांक
- वापरकर्ता भूमिका (CS Admin)

नोंद: सध्या प्रणाली भ्रमणध्वनी क्रमांक सत्यापित करत नाही; त्यामुळे स्थिती "असत्यापित" दिसू शकते.

# STEP 9-ब: वापरकर्ता मुख्य पृष्ठ




वापरकर्ता मुख्य पृष्ठावर आपली माहिती दिसेल

वापरकर्त्याला पुढील कोणती कृती करायची आहे ते येथे दाखवले आहे.

# STEP 10: पुढील टप्पे

वापरकर्ता नोंदणी पूर्ण झाल्यानंतर CS Admin ने पुढील टप्पे पूर्ण करावेत:

- Form E-2 (नमुना ई-२) भरून सादर करणे
- प्रारूप मतदार यादी (PVL) तयार करण्यासाठी विहित नमुना ई-३ / ई-३ (१) मध्ये आवश्यक माहिती प्रविष्ट करणे
- SaaS शुल्क भरणे (लागू असल्यास)
- PVL (Provisional Voters List) तयार करणे

नोंद: पुढील टप्प्यांसाठी स्वतंत्र मार्गदर्शक उपलब्ध आहे.

# धन्यवाद!

DVL प्रणालीचा प्रभावी वापर करून सहकारी निवडणुका अधिक पारदर्शक, अचूक आणि कार्यक्षम बनवूया.

मतदारांचा विश्वास वाढवूया.

आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

संपर्क:

iits.election@gmail.com

https://dvl.scea.in

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र यांच्या मार्गदर्शनाखाली.

तांत्रिक विकसक:

इन्फिनाइट आयटी सोल्युशन्स प्रा. लि.